होमगार्डना कर्तव्यभत्ता, कवायतभत्ता व प्रशिक्षणभत्ता यात वाढ मिळणेबाबत.

30

महाराष्ट्र शासन,

गृहविभाग [विशेष],

शासन निर्णय क्रमांक :एचजीएस ३६९४/२८१/[१०]/विशा-८,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक: ३० एप्रिल, १९९७.

वाचावे :- महासमादेशक, होमगार्ड्स, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ०७/ प्रशिक्षण/५४ दिनांक १ जानेवारी १९९७.

निर्णय :- केंद्र शासनाने त्यांच्याकडील पत्र क्रमांक : होमन -दोन/२१०१३/१/९२/ डीजीसीडी [एचजी] दिनांक ५.७.१९९६ अन्वये १ एप्रिल १९९६ पासून होमगार्डसाठी कर्तव्यभत्ता, कवायतभत्ता, प्रशिक्षण भत्ता, इ. मध्ये खालील प्रमाणे वाढ केली आहे.

भत्त्याचा तपशील	सध्याचे दर	सुधारित दर
अ] कर्तव्य भत्ता	रु.२२/दरडोई प्रत्येक दिवशी	रु.३१/-दरडोई प्रत्येक दिवशी.
ब] कवायत भत्ता [शहर होमगार्ड करिता]	रु.१०/-दरडोई प्रत्येक अडीच तासाच्या कवायतीस किंवा रु.२०/दरडोई :सम किंवा कालावधीच्या २ कवायतीस किंवा त्यापेक्षा अधिक कवायतीस.	रु.१४/-दरडोई प्रत्येक अडीच तासाच्या कवायतीस किंवा रु.२८/दरडोई समकालावधी-च्या २ कवायतील किंवा त्यापेक्षा अधिक कवायतीस.
क] शिबीर कालावधीत प्रशिक्षण भत्ता ग्रामीण/ शहरी होमगार्ड करिता.		
१] शिबीर भत्ता	रु.८:-दरडोई दर दिवसाला	रु.१२/-दरडोई दर दिवसाला
२] भोजन भत्ता	दरडोई रु.१२/-दर दिवसाला	दरडोई दर दिवसाला रु.१६/-

२. होमगार्डना वरील सुधारित दराने भत्ते इतर राज्यात देखील दिले जातात. होमगार्डना सुधारित दराने भत्ते देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. मध्यंतरीच्या काळात राज्य शासनाने होमगार्डना कर्तव्यभत्ता

—२

[illegible]	6734
दिनांक	21/5/90
[illegible]	25.30.

रु. २२/— वरुन रु. ५०/—इतका देण्याचा क्र. एचजीएस १९९३/६७५/सीआर—१७/विशा—८, दिनांक १९.६.९३ अन्वये शासन निर्णय ~~अमल~~ /घेतला आहे. सदर निर्णयाबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, कर्तव्यभत्ता रु. ५०/— हा यापुढेही तसाच देण्यात यावा. क्वायत भत्ता व प्रशिक्षण भत्त्यात आता केंद्र शासन शासनाच्या सूचनेनुसार वरील प्रमाणे सुधारित दराने वाढ करण्यास व त्यासाठी येणा—या खर्चास शासन या आदेशान्वये मंजूरी देत ~~xxx~~ आहे. हे सुधारित दर दि. १ एप्रिल, १९९७ पासून लागू होतील.

३. होमगार्डना लोकसभा/विधानसभा निवडणूकीच्या बंदोबस्तासाठी बोलाविल्यास त्यांना कर्तव्यभत्ता रु. ५०/—अनुज्ञेय असला तरी त्या खर्चाची प्रतिपूर्ती रु. ३१/— या दराप्रमाणे अधि/उपरोक्त क्वायत व प्रशिक्षण भत्त्यासाठी होमगार्डना येणा—या खर्चाची ~~प्रतिपूर्ती xxx केवळ x सुधारित x दराप्रमाणे~~ २५ % प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून करुन घ्यावी.

४. या निमित्त होणारा खर्च मागणी क्रमांक बी—८/मुख्य लेखाशिर्ष "२०७०—इतर प्रशासनिक सेवा १०७ होमगार्डस्" या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन १९९७—९८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा निर्णय , वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर —२६२ / ९७/व्यय—८, दि. २५.४.१९९७ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

[श्रीमती श. रा. भोजकर]

कक्ष अधिकारी, गृहविभाग [विशेष], महाराष्ट्र शासन.

प्रत,

महासंचालक, नागरी संरक्षण, भारत सरकार, नवी दिल्ली [पत्राने]

महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व जिल्हा समादेशक, ~~केन्द्र~~ होमगार्डस,

महालेखापाल, महाराष्ट्र —१/२ [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई / नागपूर.

महालेखापाल , महाराष्ट्र —१ /२ [लेखा परिक्षा], मुंबई /नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /नागपूर

निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर

वित्त विभाग [व्यय—८]

गृह विभाग [पोयुडी —१].